# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३०८/२०१०/३५

तक्रार दाखल दिनांक :- १९/१०/२०१०
निकाल दिनांक :- २५/११/२०१०

श्री अतुल अनंतराव डोळे,
वापरदार देशभुषण प्रकाशचंद पाटोदी,
रा.प्लॉट नं.५९, शांतीबन,
हरीरामनगर,बीड-बायपास,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११७९१५०३) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही.बी.मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १९/१०/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २२/११/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९००११७९१५०३ असा आहे. अर्जदार वरील ठिकाणी दिनांक २२/०८/२००८पासुन राहात असुन वीजेचा वापर करीत आहे. अर्जदाराचे घरात २८६५१०३ क्रमांकाचे मीटर लावण्यात आले असुन वरील मीटर नादुस्त असल्याबाबत महावितरण कंपनीकडे दिनांक ०२/०२/२००८,१६/०४/२००८ व ३१/०८/२००९ रोजी तक्रार दाखल केलेल्या आहेत.परंतु महावितरण कंपनीने त्याचे तक्रारीची दखल घेतली नाही. कनिष्ठ अभियंता यांनी ग्राहकाचे दिनांक २६/०३/२००८ रोजी स्थळ निरिक्षण करुन ग्राहक वापरत असलेल्या वीज भारानुसार त्यांचा सरासरी वीज वापर ४ युनिट प्रति दिन असल्याची नोंद केली आहे.परंतु ग्राहकाने प्रति दिन ३० ते ३५ युनिट प्रमाणे वीज बिल आकारणी होत असल्याचे तक्रारीमध्ये नमुद केले आहे. ग्राहकाने कनिष्ठ अभियंता यांनी दिलेल्या कोटेशन नुसार मीटर चाचणी शुल्क दिनांक ०१/०९/२००९ रोजी भरली आहे. परंतु त्यांच्या मीटरची चाचणी करण्यात आलेली नाही व मीटर बदली करण्याबाबत ग्राहकाने वारंवार लेखी तक्रारी केल्यानंतर मीटर उपलब्ध नसल्याचे कारण सांगुन नादुरुस्त मीटर बदली करण्यात आलेले नाही.वरील नादुरुस्त मीटर पुर्णपणे बंद पडल्यावर दिनांक २२/०२/२०१० रोजी बदली करण्यात आले. वरील मीटरचे अंतीम वाचन १५८६८ असे नोंदविण्यात आले ते अतिशय जास्त व अवास्तव असल्याची ग्राहकाची तक्रार आहे. वरील बदली केलेल्या मीटरची ५ महीण्यानंतर कंपनीने चाचणी करुन मीटरचे सील तुटले असल्याबाबत व मीटरमध्ये फेरफार केलेली आढळुन आल्याबाबत ग्राहकास कळविण्यात आले. अर्जदाराने बदली केलेले मीटर नादुरुस्त असल्यामुळे त्याचे अंतीम वाचन गृहीत न धरता नवीन लावण्यात आलेल्या मीटरचे वाचणाप्रमाणे मागील कालावधीकरीता वीज आकारणी करावी अशी विनंती मंचास केली.

२) वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक २२/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली सुनावणीस नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री ए.एस.खेडकर उपकार्यकारी अभियंता छावणी उपविभाग, कनिष्ठ अभियंता पी.पी.जावळे व वीज ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने लेखी निवेदन सादर करुन सांगीतले की, त्याचे मीटर जानेवारी २००८ पासुन जलद गतीने फीरत असल्याबाबत वारंवार लेखी तक्रारी महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात केलेल्या आहेत परंतु कंपनीने नादुरुस्त मीटर वेळेत बदली केले नाहीत व वीज देयक सुध्दा दुरुस्त करण्यात आले नाही याउलट कोणतीही पुर्व सुचना न देता वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. समोर दिवाळी असल्यामुळे तात्पुरती अग्रीम राशी जमा करुन वीज पुरवठा जोडुन देण्याबाबत अंतरिम आदेश देण्याची विनंती ग्राहकाने मंचास केली. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल. व मीटर चाचणी अहवाल मंचात सादर करुन सांगीतले की, मीटर रिडींग प्रमाणे ग्राहकाचे वीज बिल योग्य आहे. ग्राहकाच्या सी.पी.एल.चे व कनिष्ठ अभियंता यांनी २६/०३/२०१० रोजी केलेल्या स्थळ निरिक्षण अहवालाचे अवलोकन केले असता असे आढळुन आले की ग्राहकास माहे जोनवारी २००८ ते ऑगस्ट २००९ या कालावधीत अवास्तव वीज युनिटची आकारणी करण्यात आलेली आहे मात्र स्थळ निरिक्षण अहवालानुसार ग्राहक वापरत असलेल्या वीज भाराप्रमाणे ४ युनिट प्रति दिन वीज वापर निश्चत केलेला

आहे.त्यामुळे मंचाने ग्राहकाची विनंती मान्य करुन रुपये ८०००/- चे तात्पुरते वीज देयक भरुन घेवुन वीज पुरवठा सुरु करण्याबाबतचा अंतरिम आदेश महावितरण कंपनीस दिला व सुनावणीची पुढील तारिख ०२/११/२०१० रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०२/११/२०१० रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी व वीज ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने मंचाचे आदेशानुसार रुपये ८०००/- चा भरणा केल्यानंतर वीज पुरवठा सुरु झाल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा दिनांक ०१/११/२०१० रोजी घेतलेला स्थळ निरिक्षण अहवाल मंचात सादर केला. त्यानुसार ग्राहक एकुण ३.७७८ कि.व्हॅट वीज भार वापरत असुन वीज भाराप्रमाणे त्याचा र्निराधारीत वीज वापर १०.७५ युनिट प्रति दिन असल्याची नोंद केली आहे. नोडल अधिकारी यांनी मीटर क्रमांक २८६५१०३ चा दिनांक २८/०७/२०१० रोजी केलेला चाचणी अहवाल मंचात सादर केला.त्या अहवालानुसार मीटर बंद असुन ग्राहकाने मीटरचे आतील भागात फेरफार केली असत्याची नोंद आहे. ग्राहकाने मीटरमध्ये केलेल्या फेरफारा बद्दल आपणास काहीही माहीती नसल्याचे सांगीतले. मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाने केलेल्या निवेदनावर व तक्रारीवर मुद्देसुद जबाब सादर करण्यास सांगुन सुनावणीची पुढील तारीख १८/११/२०१० रोजी ठेवण्यात आली.

४) दिनांक १८/११/२०१०रोजी झालेल्या सुनावणीस वीज ग्राहक उपस्थित होते परंतु नोडल अधिकारी उपस्थित राहीले नाहीत व त्यांनी आपला मुद्देसुद लेखी जबाब देखील मंचात सादर केला नाही. त्यामुळे प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, मुळ वीज ग्राहक श्री अतुल अनंतराव डोळे यांचे कडुन अर्जदारा श्री देशभुषण प्रकाशचंद्र पाटोडी यांनी दिनांक २२/०८/२००८ रोजी वरील ठिकाणचे घर विकत घेतले असुन तेथे उपलब्ध असलेल्या मीटर क्रमांक २८६५१०३ वरुन ते वीजेचा वापर करीत आहेत. वरील मीटर नादुरुस्त असल्याबाबत व ते बदली करण्याबाबत पुर्वीचे वीज ग्राहक व अर्जदार यांनी महावितरण कंपनीकडे ब-याच लेखी तक्रारी दाखल केल्या असल्याचे दिसुन येते. परंतु महावितरण कंपनीने त्यांच्या तक्रारीची दखल घेतली नाही व मीटर रिडींग प्रमाणे अवास्तव वीज वापराचे वीज बिल देत राहीले. शेवटी वरील मीटर बंद पडल्यामुळे ते २०/०२/२०१० रोजी बदली करण्यात येवुन त्याठिकाणी ४१९९६ क्रमांकाचे नविन मीटर बसविण्यात आले.ग्राहकाने वरील बदली केलेल्या मीटरची चाचणी करुन त्याचा अहवाल मीळण्याबाबत महावितरण कंपनीकडे मीटर चाचणी शुल्क रुपये १००/- दिनांक ०१/०९/२००९ रोजी भरलेले आहे. परंतु त्याच्या मीटरची चाचणी वेळेत करण्यात आलेली नाही.

६) कनिष्ठ अभियंता यांच्या दिनांक २६/०३/२००८ रोजी घेतलेल्या स्थळ निरिक्षण अहवालानुसार ग्राहकाचे मीटर रिडींग २०७४ असुन, मीटरचे सील योग्य असल्याचे, मीटर योग्य पध्दतीने फिरत असल्याचे व ग्राहकाच्या वीज भारानुसार वीज वापर ४ युनिट प्रति दिन म्हणजेच १२० प्रति महा असल्याची नोंद केली आहे. ग्राहकाने दिनांक ३०/०४/२००७ रोजी वीज पुरवठा घेतला आहे यावरुन ग्राहकाचा वीज वापर दिनांक ३०/०४/२००७ ते २६/०३/२००८ या १२ महीण्याच्या कालावधीत २०७४ युनिट, म्हणजेच १६० युनिट प्रति माह झाल्याचे दिसुन येते.ग्राहकास नविन मीटर क्रमांक ४१९९६ दिनांक२०/०२/२०१० रोजी बसविण्यात आले नोडल अधिकारी यांनी

दिनांक ०१/११/२०१० रोजी घेतलेल्या स्थळ निरिक्षण अहवालावर वरील मीटरचे वाचन १३४३ असल्याची नोंद केलेली आहे म्हणजेच २०/०२/२०१० ते ०१/११/२०१० या ८.५ महीण्याच्या कालावधीत ग्राहकाचा वीज वापर १३४३ युनिट म्हणजेच १५८ युनिट प्रति महा झाल्याचे दिसुन येते.

७) ग्राहकाच्या सी.पी.एल.चे निरिक्षण केले असता ग्राहकास खालील महीण्यामध्ये अवास्तव वीज आकारणीची वीज देयक देण्यात आल्याचे दिसुन येते.

| अ.क्र | महीना | . युनिट आकारणी |
|---|---|---|
| १) | जानेवारी २००८ | ६६० |
| २) | जूलै २००८ | २१९० |
| ३) | ऑगस्ट २००८ | ५३८ |
| ४) | सप्टेबर २००८ | ५३६ |
| ५) | ऑक्टोबर २००८ | ५३६ |
| ६) | नोव्हेबर २००८ | ३०१५ |
| ७) | डिसेबर २००८ | २४५४ |
| ८) | जानेवारी २००९ | ९६७ |
| ९) | मार्च २००९ | १७९६ |
| १०) | एप्रिल २००९ | १२०९ |

८) वरील आकारणीवरुन ग्राहकाचे जुने मीटर क्रमांक २८६५१०३ हे नादुरुस्त होवुन जलद गतीने फिरत होते ही ग्राहकाने केलेली तक्रार योग्य असल्याचे दिसुन येते. ग्राहकाच्या तक्रारी नुसार त्याचे कडुन मीटर चाचणी शुल्क भरुन घेण्यात आले परंतु त्याची वेळेत चाचणी करण्यात आली नाही. याउलट मीटर बदली केल्यानंतर जवळपास ५ महीण्यानंतर मीटरची चाचणी करुन मीटरमध्ये फेरफार झाल्याचा अहवाल ग्राहकास देण्यात आला.नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे तक्रारीनुसार मुद्देसुद अहवाल सादर करण्यास सांगीतले असता त्यांनी कोणतेही लेखी निवेदन मंचात सादर केले नाही.सी.पी.एल.नुसार ग्राहकाने माहे मे २००८ पर्यंतचे वीज देयकाचा भरणा केला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे पुढील कालावधीकरीता ग्राहकाची तक्रार ग्राह्य धरुन त्यांना नविन मीटरनुसार झालेल्या वीज आकारणी प्रमाणे वीज देयक देणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनी तर्फे ग्राहकास माहे जुन २००८ ते फेब्रुवारी २०१० या कालावधीत देण्यात आलेले सर्व वीज देयक रद्द करण्यात येत आहे, त्याऐवजी ग्राहकास वरील कालावधीकरीता १६० युनिट प्रति माह प्रमाणे वीज आकारणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

३) वरील कालावधीत ग्राहाकाने भरणा केलेल्या वीज बिल रक्कमेची व मंचाचे अंतरिम आदेशानुसार भरलेल्या रक्कमेची सुधारीत वीज देयकातुन वजावट करावी.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **व्ही. बी. मंत्री** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |